ePaper
इर्शाळवाडीतील बचावकार्य आता थांबवले; 27 रहिवाशांचा मृत्यू,

वर्ष - 7 । अंक - 83 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www .mahaenews.com | सोमवार , दिनांक 24 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



**आतील पानांत**

- मोदींकडून शिंदेंचे कौतुक
- डोळ्यांची साथ येईना आटोक्यात
- ‘अब की बार १२५ पार’ करणार
- बरेलीत कावड यात्रेवर दगडफेक

# नदी संवर्धनासाठी ‘सतर्कता’!

## »महापालिका प्रशासन आक्रमक : पात्रात राडारोडा टाकण्याऱ्या तिघांवर गुन्हा

। पिंपरी
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपळे गुरव येथे पवना नदीच्या पात्रात राडारोडा टाकल्या प्रकरणी तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शनिवारी (दि. 22) दुपारी अडीच वाजताच्या सुमारास घडली.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागातील आरोग्य निरीक्षक अमोल गणपत गोरखे (वय 48) यांनी याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार नागनाथ अंबादास मंजुळकर (वय 55), शिवाप्पा लकप्पा पुजारी (वय 32, दोघे रा. चतुश्रृंगी, पुणे), हनुमंत पटलाप्पा पवार (वय 32, रा. जुनी सांगवी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी त्यांच्या ताब्यातील दोन टेम्पो आणि एक ट्रॅक्टरच्या सहाय्याने पिंपळे गुरव येथे पवना नदी पात्रात अनधिकृतपणे राडारोडा टाकला. नदीचे पाणी प्रदूषित करण्याची कृती केल्याबाबत त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले आहे. सांगवी पोलीस तपास करीत आहेत.

### नदी वाचवा... नागरिकांची मागणी...



» वाढत्या शहरीकरणामुळे नद्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्याचा दुष्परिणाम शहरात वेळोवेळी आलेल्या महापुराच्या घटनेतून सर्वांनीच अनुभवला आहे. काळेवाडी, रहाटणी परिसरात निर्माण होणारा राडारोडा थेट पवना नदीत आणून टाकला जात आहे. यामुळे कचरा, बांधकामातील राडारोडा, दगडधोंडे, तुटलेल्या फरशा आदी वस्तूंचा भलामोठा ढिगारा नदी पात्रात तयार झाला आहे.दरम्यान, शासकीय सुट्टीच्या दिवशी किंवा सकाळी लवकर, सायंकाळी व रात्री याठिकाणी मोठ्याप्रमाणात राडारोडा टाकला जातो. नदी किनारी किंवा पात्रालगत टाकण्यासाठी वाहून आणला जाणारा राडारोडा क्रमांक नसलेल्या वाहनांतून आणला जातो. त्यामुळे नियोजनबद्ध नदी बुजविण्याचे काम सुरू असल्याचे दिसून येते. महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस व मोटार वाहन विभागाने तातडीने लक्ष घालून नदी वाचवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# दांडीबहाद्दर कर्मचाऱ्यांना ‘पीएमपी’ चा दणका!

## »36 कर्मचाऱ्यांचे निलंबन : तीघांना कार्यमुक्तीचे आदेश

। पिंपरी । महाईन्यूज ।

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडने आता आपल्या कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीशी संबंधित समस्यांवर कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. वारंवार गैरहजर राहिल्याबद्दल ३६ कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. याशिवाय, पीएमपीएमएलचे नवनियुक्त अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक (सीएमडी) सचिंद्र प्रताप सिंग यांनीही याच मुद्द्यावरून तीन कर्मचाऱ्यांच्या कार्यमुक्तीचे आदेश जारी केले आहेत.**




पीएमपीएमएलच्या म्हणण्यानुसार, सीएमडीने ३० कंडक्टर आणि ६ ड्रायव्हरसह ३६ कर्मचाऱ्यांचे निलंबनाचे आदेश जारी केले आहेत, जे यापूर्वी अनेक प्रसंगी ड्युटीवर गैरहजर राहिले आहेत. या कारवाईनंतर दोन चालक आणि वर्कशॉपमध्ये काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्यासह तीन कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे. याशिवाय २२ जुलै रोजी कोणतीही पूर्वसूचना न देता गैरहजर राहिल्याबद्दल ७८ कंडक्टर आणि ६४ ड्रायव्हरसह १४२ कर्मचाऱ्यांना नोटिसाही बजावल्या आहेत.

“पीएमपीएमएलच्या जास्तीत जास्त बस रस्त्यावर धावतील, प्रवाशांना कमी गैरसोयीचा सामना करावा लागेल, कर्मचाऱ्यांची गैरहजरी कमी व्हावी यासाठी आणि पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांमध्ये शिस्त राखण्यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे”, असं पीएमपीएमएलने एका निवेदनात म्हटले आहे.

### तक्रारी गोळा करण्यासाठी ‘प्रवासी दिवस’ उपक्रम...

**»पीएमपीएमएलने नुकताच महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शुक्रवारी प्रत्येक डेपोमध्ये नागरिकांकडून प्रतिक्रिया आणि तक्रारी गोळा करण्यासाठी ‘प्रवासी दिवस’ हा उपक्रम सुरू केला आहे. याशिवाय, पीएमपीएमएल आगारातील अधिकाऱ्यांना सकाळी ८ ते ११ या वेळेत बसमधून प्रवास करण्याचे आणि दर शनिवारी कर्मचाऱ्यांशी संवाद साधून सकाळी ५ ते ८ या वेळेत सुविधांचा आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**

# डोळ्यांची साथ येईना आटोक्यात!

## » औषधोपचार सुरुच; रुग्णसंख्या साडेसहा हजारांवर

। आळंदी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तीर्थक्षेत्र आळंदीत वातावरणातील बदलामुळे मुलांना उद्धवलेली डोळे येण्याची साथ आटोक्यात येत नाही. मागील आठ दिवसांत सुमारे साडेसहा हजारांहून अधिक शाळकरी मुलांना या साथीच्या आजाराला सामोरे जावे लागले आहे. दरम्यान प्रारंभीच्या दिवसात ज्या मुलांचे डोळे आले होते, त्यांच्यात उपचारानंतर बऱ्यापैकी सुधारणा झाल्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. इंदिरा पारखे यांनी सांगितले.**



आळंदी शहरात सहा ते सोळा वर्ष वयोगटातील मुला - मुलींचे डोळे येण्याची साथ पसरली आहे. यापार्श्वभूमीवर तालुका आरोग्य प्रशासन व आळंदी ग्रामीण रुग्णालय अलर्ट झाले असून आठ दिवसांपासून आवश्यक त्या उपाययोजना करत आहे. आळंदी व्यतिरिक्त तालुक्यातील इतर ग्रामीण रुग्णालयांतर्गत असलेल्या गावांमधील शाळा, आश्रमशाळा, अंगणवाडीतील मुलांचा सर्व्हे करण्यात आला आहे. विशेषतः सद्यस्थितीत आळंदीत राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रम अंतर्गत दहा पेक्षा अधिक पथके कार्यरत आहेत. शहरातील विविध ठिकाणी असणाऱ्या संस्थेमध्ये जाऊन मुलांची तपासणी केली जात आहे. डोळ्यांची लागण झालेल्या मुलांना तात्काळ औषधे देण्यात येत आहेत. आजपर्यंत १९ हजार ६६८ नागरिकांची तपासणी करण्यात आली आहे. दरम्यान सोमवार ते शुक्रवारपर्यंत डोळे लागण झालेल्या रुग्णांची संख्या अडीच हजार होती. मात्र शनिवारी (दि.२२) पुन्हा २ हजार ९४ तर रविवारी १ हजार ४८२ रुग्णांची वाढ झाली आहे. त्यामुळे आळंदी शहर व परिसरात एकूण रुग्ण संख्या ६ हजार ४०३ इतकी झाली आहे. यापार्श्वभूमीवर रविवारी (दि.२३) आळंदी शहरातील वारकरी शिक्षण संस्थेच्या चालक तथा प्रमुखांची रुग्णालयात एकत्रित बैठक घेण्यात आली. वाढत्या आजारासंदर्भात आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. प्रारंभी ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांना मोठ्या प्रमाणात हा संसर्ग झाला होता. मात्र आता त्या पुढील वयोगटातही संसर्ग होत असल्याचे निदर्शनास येत आहे. कोरोनासारखा हा आजार नसल्याने पालकांनी घाबरून जाऊ नये. उपचारानंतर सात ते आठ दिवसांत हा आजार बरा होऊ शकतो. मात्र आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन माहिती वैद्यकीय अधिक्षक डॉ. उर्मिला शिंदे यांनी केले आहे.

### आळंदीव्यतिरिक्त इतर गावातही सर्व्हे

» आळंदी ग्रामीण रुग्णालयात एनआयव्हीचे सिव्हिल सर्जन तपासणी पथकाद्वारे बाधित मुलांची तपासणी करून त्यावर उपचार केले जात आहेत. तर रुग्णालयात दोन नेत्रतज्ज्ञांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. आळंदी व्यतिरिक्त इतरही गावांमध्ये वैद्यकीय पथकांनी मुलांचा सर्व्हे केला असून डोळे आलेल्यांवर आवश्यक उपचार केले जात आहेत.

# तळेगावात भाडेकरार बंधनकारक

## » बेकायदेशीरपणे राहणाऱ्या भाडेकरुंवर कडक कारवाई करणार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाढत्या गुन्हेगारी घटनांच्या पार्श्वभूमीवर भाडेकरार बंधनकारक असून, भाडेकरूंची माहिती भाडेकराराच्या प्रतीसह तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्याला देणे सक्तीचे आहे. घरमालकांसह बेकायदेशीरपणे राहणाऱ्या भाडेकरूंवर देखील कडक कारवाई करणार असल्याचा इशारा तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सत्यवान माने यांनी दिला आहे.**



### सहकार्य करण्याचे आवाहन...

» सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी भाडेकरूंची पोलिस पडताळणी केल्याशिवाय सोसायटीत प्रवेश दिल्यास त्यांच्यावर प्रचलित कायद्यांतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येईल. ऑनलाइन भाडेकरूंची पडताळणी केल्यास त्याची एक प्रत देणे बंधनकारक आहे. तसेच कोणी अवाजवी अनामत रक्कम मागत असेल तर पोलिस ठाण्यात कळवावे. याकामी तळेगाव दाभाडे भागातील घरमालक, रहिवासी सोसायट्यांचे चेअरमन, सचिव, घरमालक, भाडेकरू आदींनी सहकार्य करण्याचे आवाहन वरिष्ठ पोलिस निरीक्षक सत्यवान माने यांनी केले आहे.

तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्याच्या हद्दीत शिक्षण, नोकरी, व्यवसायानिमित्ताने बाहेरच्या ठिकाणाहून, राज्यातून बरेचजण कायम अथवा तात्पुरते राहण्यासाठी येत असतात. अशा लोकांना घर भाड्याने देताना भाडेकरूंची नोंद पोलिस ठाण्याला देणे बंधनकारक असतानाही बरेच घरमालक जाणूनबुजून या बाबीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. परिसरात यापूर्वी भाड्याने घर घेऊन राहणारे काहीजण गुन्हेगारी करून परागंदा झाल्याच्या घटना घडल्या आहेत. परिसरात वाढत्या गुन्हेगारी घटना पाहता सार्वजनिक सुरक्षा, कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्या हेतूने भाडेकरूंची इथ्यंभूत माहिती पोलिस ठाण्याकडे असणे गरजेचे आहे. तळेगाव दाभाडे पोलिसांनी 'आपले तळेगाव, सुरक्षित तळेगाव' उपक्रमांतर्गत बेकायदेशीर भाडेकरूबाबत आक्रमक पवित्रा घेतला आहे. विहित नमुन्याची प्रत पोलिस ठाण्यात उपलब्ध करण्यात आली आहे.

घर भाड्याने देणाऱ्या घरमालकांनी विहित नमुन्यात माहिती भरून त्याला एक भाडेकराराची स्वसाक्षांकीत प्रत जोडून पोलिस ठाण्याच्या PITALEGAOND.PCPC-MH@MAH.GOV.IN या मेल आयडीवर अथवा पोलिस ठाण्यात जमा करावी. वाणिज्यिक वापरासाठी भाड्याने दिलेल्या मालमत्तेसाठी देखील हा नियम लागू असणार आहे. माहिती पोलिस ठाण्याला सादर न केल्यास संबंधित घरमालकासह भाडेकरूंवर कलम १८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

# स्वयंसिद्धाच्या संमेलनात कवितांचा 'पाऊस'

। पिंपरी । महाईन्यूज ।

'तुझ्याचसाठी आयुष्याचा मेघ चाललाय उतू उतू', 'ज्याला काही चोरायाचे त्याने समुद्र चोरावा', 'दार जिंदगीचे जोरात ठोठवा', 'दर्यात पोहणारा माणूस वाचवा' अशा अनेक दर्जेदार कवितांमधून म. भा. चव्हाण यांनी श्रोत्यांना खिळवून ठेवले. निमित्त होते, स्वयंसिद्धा प्रतिष्ठानतर्फे चिंचवड येथील प्रतिभा महाविद्यालयात आयोजित काव्यधारा कविसंमेलनाचे.

चव्हाण म्हणाले, "कविता सुचणे, लिहिणे व सादर करणे हे एक शास्त्र आहे." कवी अनिल दीक्षित प्रमुख पाहुणे होते.

त्यांनी महाकवी कालिदास आणि त्यांच्या 'मेघदूत' काव्याची माहिती सांगितली. 'मोहरती जशी आंबराईतली झाडं,' 'पक्ष फोडला फोडला फोडला' अशा रचना त्यांनी सादर केल्या.

तसेच, श्यामराव सरकाळे (विठुरायाची वारी), तानाजी एकोंडे (जीव शोधतो), आत्माराम हारे (पाण्याचा दुष्काळ), प्रदीप तळेकर (तुझ्या मनात), कैलास भैरट (येरे पावसा), अभिजित काळे (सल), भरत बारी (काश्मीर एक अनुत्तरीत प्रश्न), प्रकाश निर्मळ (पुन्हा एक दगा झाला), प्रदीप गांधलीकर (पावसाचे गाणे), हेमंत जोशी (आषाढाच्या थेंबांसगे आली गझल), शिरीष पत्की (बहर), नीलेश शेंबेकर (कोकणातला पाऊस), विवेक कुलकर्णी (आला पाऊस पाऊस), नंदकुमार कांबळे (रंग), राजेंद्र वाघ (भिजू पावसात), अरुण कांबळे (कबीर), विनोद अष्टूळ ( रोज सांजेला तू घरट्यात हवा), दत्तात्रय खंडाळे (विडंबन कमळाबाईनं घड्याळ फोडलं), चंद्रकांत धस (दुनियेसाठी) यांनीही कविता सादर केल्या.

संस्थेचे उपाध्यक्ष श्री नंदकुमार मुरडे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षा सविता इंगळे आणि कार्याध्यक्ष दिनेश भोसले यांनी सूत्रसंचालन केले. कोषाध्यक्षा वर्षा बालगोपाल यांनी आभार मानले.

# कार्यकर्त्यांना ताकद देणार अन् ‘अब की बार 125 पार’ करणार!

## » नवनियुक्त शहराध्यक्ष शंकर जगताप यांचा विश्वास



। आळंदी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमध्ये भारतीय जनता पार्टीचा विशाल वटवृक्ष तयार झाला आहे. शहराध्यक्षपदाच्या काळात पक्षाचा हा वटवृक्ष जोपासण्यासाठी आणि कायम फुलत ठेवण्यासाठी सचोटीने आणि प्रामाणिकपणे कार्यरत राहीन. लोकनेते दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांच्याप्रमाणेच कार्यकर्त्यांना ताकद देण्याची भूमिका ठेवणार आहे, अशा भावना भाजपाचे नवनियुक्त शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केल्या आहेत.**

भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवडच्या शहराध्यक्षपदी शंकर जगताप यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी चार दिवसांपूर्वी तशी घोषणा केली. यानंतर चिंचवड, वाल्हेकरवाडी येथील आहेर गार्डनमध्ये त्यांचा पदग्रहण सोहळा रविवारी उत्साहात पार पडला. यावेळी यावेळी आमदार महेश लांडगे, अश्विनी जगताप, उमा खापरे, माजी खासदार अमर साबळे, पूर्व महापौर उषा उर्फ माई ढोरे, पिंपरी-चिंचवड प्रभारी वर्षा डहाळे, प्रदेश निमंत्रित सदस्य सदाशीव खाडे, भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते महेश कुलकर्णी, पूर्व सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळूराम बारणे, पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे, भोसरी विधानसभा निवडणूक प्रमुख, विकास डोळस, प्रदेश विशेष निमंत्रित सदस्य राजेश पिल्ले, संतोष कलाटे त्याचप्रमाणे शैलाताई मोळक, विकास डोळस, मोरेश्वर शेडगे, सचिन साठे, महेश कुलकर्णी, विलास मडीगेरी, संकेत चोंधे, उज्वलाताई गावडे, मंडल अध्यक्ष योगेश चिंचवडे, विनोद तापकीर, विजय शिनकर, महेंद्र बाविस्कर, महादेव कवितके, राजेंद्र लांडगे, कोमल शिंदे, कमलेश बहरवाल, अजित कुलथे यांच्यासह पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, शंकर जगताप यांच्या पाठीशी पूर्व शहराध्यक्ष तथा लोकनेते दिवंगत लक्ष्मण जगताप यांचा वारसा आहे. त्यांचा आदर्श त्यांनी डोळ्यांसमोर ठेवला आहे. या सोबतच त्यांच्याकडे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख आणि पूर्व नगरसेवक म्हणून अनुभव आहे. यापुढील काळात शंकर जगताप यांच्या पाठीशी त्यांचा भाऊ म्हणून, मित्र म्हणून, सहकारी म्हणून खंबीरसाथीने उभा राहणार आहे. कार्यकर्त्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊन देणार नाही. जसे माझ्या पाठीमागे आपण सर्वजण उभे राहिलात, त्याच ताकदीने आपण शंकर जगताप यांच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

राज्यसभेचे पूर्व खासदार अमर साबळे म्हणाले की, भारतीय जनता पार्टीमध्ये दर ३ वर्षाने अध्यक्ष हा बदलत असतो. पक्षाने निवड केलेल्या अध्यक्ष्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून पक्ष संघटना बळकटीकरण करावे हेच आपल्या पक्षाचे संस्कार आहेत. त्याचे आपण सर्वांनी पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नामदेव ढाके यांनी केले. सूत्रसंचालन राजू दुर्गे यांनी केले. काळूराम बारणे यांनी आभार मानले.

> “ राज्यातील व शहरातील सर्व नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी दिलेली शहराध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत असताना कदाचित मी सर्वगुणसंपन्न वाटत नसेल, तर वरिष्ठ नेत्यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन करावे. कुठे चुकलो तर माझी कानउघाडणी करावी. मी मनात कोणताही द्वेष न ठेवता पक्षवाढीचे काम करत राहणार आहे. पक्षात काही मतभेद असले तरी मनभेद होऊ देणार नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपा परिवारातील मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांच्याप्रमाणेच कार्यकर्त्यांना ताकद देण्याचे काम करणार आहे. तसेच, देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी पिंपरी-चिंचवडमधून संघटन सक्षम करण्यासाठी कार्यरत राहणार आहे.
>
> **- शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड**

# वाकडमध्ये साकारणार योगा- सांस्कृतिक भवन

## » माजी नगरसेवक गायकवाड यांचा पाठपुरावा : आ. जगताप यांच्याहस्ते भूमिपूजन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाकड परिसरातील नागरिकांना विविध सुविधा पुरविताना सांस्कृतिक भवन व योगा भवनची गरज लक्षात घेता वाकड परिसरात सांस्कृतिक भवन व योगा भवन उभारण्यात यावे, अशी इच्छा माजी नगरसेवक विनायक गायकवाड यांनी लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांच्याकडे व्यक्त केली होती.**

त्या अनुषंगाने तत्काळ लोकनेते तत्कालीन आमदार स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांनी सांस्कृतिक भवन व योगा भवन प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने आपल्या आमदार निधीतून प्रकल्प उभारण्यासाठी पाठपुरावा केला व हा प्रकल्प मंजूर करून घेतला होता.

तद्नंतर आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी पाठपुरावा करीत या कामास प्रारंभ केला आहे.या प्रसंगी स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सौ. ममताताई विनायक गायकवाड, माजी नगरसेवक विनायक गायकवाड, पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्या भारती विनोदे, भाजपा शहर उपाध्यक्ष राम वाकडकर, मा. नगरसेविका श्रीमती आरती चोंधे, त्याचप्रमाणे पिंपळे निलख, विशाल नगर, वाकड परिसरातील ज्येष्ठ नागरिक संघांचे सदस्य, विविध सोसायटी मधील सदस्य व परिसरातील नागरिक उपस्थित होते. यावेळी आमदार अश्विनीताई जगताप म्हणाल्या की, “साहेबांनी वाकड परिसरातील नागरिकांचा विचार करिता त्यांच्या सोयीचे, आवडेल असे, सोयी सुविधायुक्त व अद्ययावत असे सांस्कृतिक भवन व योगा भवन साकारण्यासाठी पाठपुरावा व प्रयत्न केले होते. आज या प्रकल्पांचे भूमिपूजन होत आहे व लवकरच येथील नागरिकांना हे प्रशस्त असे प्रकल्प अनुभवायला मिळेल.”



### लक्ष्मणभाऊंची साथ आजूनही सोबत

» माजी नगरसेवक विनायक गायकवाड म्हणाले, “आज स्व. भाऊंच्या निधीतील विकास प्रकल्पांचे भूमिपूजन होत असताना लक्ष्मणभाऊंची साथ आजूनही माझ्या सोबत आहे, याची अनुभूती माझ्यासारख्या कार्यकर्त्यास नक्कीच आली. ते हयात असताना भाऊंसमोर मी जेव्हा ही कल्पना मांडली, तेव्हा त्यांनी तत्काळ आपल्या आमदार निधीतून अद्ययावत अशा प्रकल्प उभारणीसाठी पाठपुरावा केला होता. पुढे अश्विनीवहिनींनी देखील पाठपुरावा करीत हे काम चालू करून घेतले व लवकरात लवकर हे प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.”

# फुटबॉलचा नवा सौदागर..




**सौदी अरेबियामध्ये गेल्या काही दिवसांत किंवा आठवड्यांमध्ये युरोपातून गेलेल्या व्यावसायिक फुटबॉलपटूंचा एखादा प्रतीकात्मक संघ सहज बनू शकतो. आणि हा संघ युरोपातील कोणत्याही श्रेष्ठ क्लब संघाशी टक्कर घेऊ शकतो! या विषयावर मध्यंतरी या स्तंभातून थोडेफार लिहिले गेले होते.**



अरबस्तानातील काही श्रीमंत देश खेळांच्या स्पर्धा भरवून नवी सांस्कृतिक ओळख निर्माण करणे आणि त्याद्वारे प्रतिमासंवर्धन करणे या उद्योगात गुंतलेले आहेत. यातून मोठाल्या क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन करून प्रगत राष्ट्रांना या क्षेत्रातील सक्षम पर्याय निर्माण करण्यात हे देश यशस्वी होऊ लागले आहेत. सौदी अरेबियाने युरोपातील फुटबॉलपटूंविषयी आरंभलेला सौदे प्रयोग यापेक्षा थोडा निराळा आणि सखोल आहे. त्या देशाचे युवराज आणि वास्तवातील सत्ताधीश मोहम्मद बिन सलमान यांनी तेलापलीकडच्या उत्पन्नस्रोतांवर लक्ष केंद्रित केले आहे. यातूनच सौदी अरेबियाला एकीकडे टुरिस्ट हब म्हणून विकसित करताना, दुसरीकडे युरोपबाहेरील प्रमुख व्यावसायिक फुटबॉल केंद्र म्हणून नावारूपाला आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. फुटबॉल प्रोजेक्टला निधी साह्य थेट सौदी सॉव्हरिन फंडाकडून (पब्लिक इन्व्हेस्टमेंट फंड – पीआयएफ), म्हणजे सरकारी खजिन्यातून होत आहे. सौदी प्रो लीग किंवा एसपीएलमध्ये खेळणाऱ्या १८ संघांपैकी चार प्रमुख संघांचे ७५ टक्के भागभांडवल पीआयएफने खरीदले आहे. हे चार क्लब म्हणजे अल हिलाल, अल नासर, अल अहली आणि अल इत्तिहाद. यांतील एक-दोन नावे हल्ली फुटबॉलरसिकांच्या वरचेवर कानावर पडत असतात. अल नासरने युरोपातील सरत्या हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात मँचेस्टर युनायटेडकडून ख्रिस्तियानो रोनाल्डोला एसपीएलमध्ये आणले. रेआल माद्रिदचा फ्रेंच स्ट्रायकर करीम बेन्झिमा याच्याकडे रेआलकडून खेळण्यासाठी आणखी एक हंगाम शिल्लक होता. त्याने सौदी क्लब अल इत्तिहादला पसंती दिली. चेल्सी आणि फ्रान्सचा प्रतिभावान मिडफिल्डर एन्गोलो कान्ते हाही याच क्लबकडून खेळेल. युएफा चँपियन्स लीग स्पर्धेच्या अंतिम फेरीत यंदा मँचेस्टर सिटीविरुद्ध इंटर मिलानचा संघ खेळला. या संघाचा कर्णधार मार्सेलो ब्रोझोविच हा क्रोएशियन फुटबॉलपटू ३० वर्षांचा आहे. म्हणजे त्याच्याकडे युरोपात खेळण्यासाठी अजून काही वर्षे शिल्लक होती. बार्सिलोना क्लबने त्याला करारबद्ध करण्याविषयी उत्सुकता दर्शवली. पण बार्सिलोनाची ऑफर धुडकावण्याइतपत बिदागी ब्रोझोविचला अल नासरने देऊ केली. त्यामुळे ब्रोझोविच अल नासरशी करारबद्ध झाला. हा निदान तिशीत पदार्पण तरी करत होता. पण इंग्लिश क्लब वुल्वरहॅम्प्टन वाँडर्सकडील रुबेन नेवेस या पोर्तुगीज फुटबॉलपटूची कथा आणखी वेगळी. तो खरे तर २६ वर्षांचाच आहे. यंदा इंग्लिश प्रीमियर लीगमध्ये वुल्वरहॅम्प्टनची कामगिरी जरा बरी झाली होती. हा बऱ्यापैकी श्रीमंत क्लब आहे. तरीही या क्लबसाठी किंवा इंग्लिश वा युरोपीयन लीगमध्ये खेळत राहण्याऐवजी नेवेसने सौदी अरेबियातील अल हिलाल क्लबसाठी खेळण्याचा निर्णय घेतला. या असल हिलाल क्लबकडून लिओनेल मेसीही खेळेल, अशी अफवा मध्ये जोरदार उठली होती. सौदी लीगमध्ये गेल्यानंतर नेवेससाठी युरोपियन लीगचे दरवाजे जवळपास बंद होते. बहुधा त्याला पोर्तुगालकडून खेळणेही अवघड जाईल. पण ही जोखीम पत्करण्याची नेवेसची तयारी आहे. नेवेसचे कंत्राट आणखी एक वर्षासाठी शिल्लक होते. परंतु अल हिलालने त्याच्यासाठी देऊ केलेले ४.७ कोटी पौंड वुल्वरहॅम्प्टनला भविष्यातील गुंतवणुकीसाठी मोलाचे वाटले. चेल्सी क्लबची कथा आणखी रंजक. कान्टेपाठोपाठ एडुआर्ड मेंडी, कालिडू कुलीबाली, हकीम झियेच हे आणखी तीन फुटबॉलपटू सौदी प्रो लीगच्या मार्गावर आहेत. त्यांचे व्यवहार अंतिम टप्प्यात आहेत. चेल्सी क्लबची कामगिरी यंदाच्या इंग्लिश हंगामात समाधानकारक अजिबातच नव्हती. जवळपास ६० कोटी पौंडांची खैरात करूनही अपेक्षित कामगिरी झाली नाही. तेव्हा भविष्यात योग्य गुंतवणुकीसाठी प्रथम त्यांच्याकडील काही खेळाडूंना विकणे क्रमप्राप्त होते.

## संपादकीय »

### नवीन प्राण चाहिये...

***राजकारणात पक्षांतरे नवीन नाहीत. परंतु २०१४ सालच्या नव-भाजपच्या उदयानंतर झालेली पक्षांतरे आणि त्याआधीचे हे प्रकार यांत मूलत: फरक दिसतो..***

स्वत:कडे स्वत:ची युद्धसक्षमता विकसित करण्याऐवजी प्रतिपक्षाचा युद्धनिपुण सेनानीच पळवण्याचा भाजपचा शॉर्टकट त्या पक्षाच्या मुळावर आलेला आहे.. मणिपुरात भाजपचे सरकार का संकटात आले? पश्चिम बंगाल, कर्नाटक, हिमाचल प्रदेश, पंजाब, बिहार आदी राज्यांत भाजपचा पराभव का झाला वा हा पक्ष सत्ताच्युत का झाला? आगामी काळात मध्य प्रदेश, छत्तीसगड किंवा महाराष्ट्र अशा अन्य काही राज्यांत हा पक्ष संकटात येण्याची चिन्हे आहेत, ती का? असे काही अन्य प्रश्नही विचारता येतील. तथापि या सगळ्या प्रश्नांच्या उत्तरांत एक समान धागा आहे. तो असा की या सर्व ठिकाणी भाजपने नवीन राजकारणाचा प्रयोग केला. ते योग्यच. पण हे नवीन राजकारण करण्यासाठी भाजपने निवडलेले भिडू हे प्राधान्याने जुने होते वा आहेत. राजकारणात पक्षांतरे नवीन नाहीत. ती भाजपने सुरू केली असे तर अजिबात नाही. पक्षांतर हे भारतीय राजकारणाचे अविभाज्य अंग राहिलेले आहे.

**सर्वोच्च न्यायालयाचे आदेश डावलत राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे टाळले आहे. त्यासंदर्भात झालेल्या घटनात्मक पायमल्लीचा मुद्दा अधोरेखित करणारी याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश डावलत राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे टाळले आहे.**

# नीतिमत्ता आणि निवडणूक आयोग

घटनात्मक पायमल्लीचा मुद्दा अधोरेखित करणारी याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. काय होती ही याचिका? ती नाकारून घटनात्मक मुद्द्यांच्या चर्चेची संधी कशी आणि का दवडली गेली आहे? महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतरही निवडणुका झालेल्या नाहीत. सदर निवडणुका राज्यघटनेतील २४३ (यू) मधील तरतुदीनुसार वेळेच्या आत पूर्ण करणे राज्य निवडणूक आयोगाला बंधनकारक आहे. पण आयोगाने त्याच्या कर्तव्यांचे पालन केलेले नाही. त्याने घटनेतील तरतुदींचा भंग केला आहे, या कारणास्तव भारतीय दंड संहितेअंतर्गत राज्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध राजद्रोहाचे कलम १२४ अंतर्गत गुन्हा दाखल करावा यासाठी रोहन सुरेश पवार यांनी राज्य निवडणूक आयोगाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली होती. सदर याचिका फेटाळण्यात आली असली तरीही त्यात



घटनात्मक नीतिमत्तेसंदर्भात जे महत्त्वाचे मुद्दे उपस्थित झाले आहेत, त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे. म्हणून हा लेखनप्रपंच. सदर याचिकेमध्ये याचिकाकर्त्यांने राज्यघटनेतील अनुच्छेद २४३ (ई) आणि २४३ (यू) तसेच महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट १९४९ मधील कलम ६ आणि ६ (ब) व कलम ४५२ अ (२) च्या तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्तांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या नाहीत म्हणून याचिका दाखल केली. त्यात विनंती करण्यात आली होती की मुख्य निवडणूक आयुक्तांनी निवडणुका न घेऊन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केले असून आपले घटनात्मक कर्तव्य पार पाडलेले नाही म्हणून त्यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता १९६० च्या कलम १२४ अ (देशद्रोह) अंतर्गत गुन्हा दाखल करावा. याचिकाकर्त्यांनी आपल्या लेखी याचिकेत या खटल्याशी संबंधित सर्वोच्च न्यायालयाचे आदेश मुंबई उच्च न्यायालयासमोर मांडले. त्यात महाराष्ट्रातील २४८६ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेवर झाल्या नाहीत या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने ३ मार्च २०२२, २० जुलै २०२२ आणि २८ जुलै २०२२ रोजी त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाला उपरोक्त सर्व प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास निर्देश दिले आहेत, असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करीत नाही आणि आपली घटनात्मक जबाबदारी पार पाडत नाही म्हणून त्यांच्यावर भारतीय दंड संहिता १९६० च्या कलम १२४ अ (देशद्रोह) अंतर्गत गुन्हा दाखल करावा.

## ।। अभंगवाणी ।।



नाहीं काम माझें काज तुम्हांसवें ।
होतें गुप्त ठावें केलें आतां ॥१॥

व्यभिचार माझा पडिला ठाउका ।
न सर ती लोकांमाजी जालें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मोदींकडून शिंदेंचे कौतुक!

## » महाराष्ट्राचे गतिशील मुख्यमंत्री मोदींचं मराठीतून ट्वीट

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजित पवार यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून राजकीय वर्तुळात एक गट सातत्याने एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्रीपदावरुन कोणत्याही क्षणी गच्छंती होईल, अशी चर्चा करत आहे.**



अजित पवार हेच पुढचे मुख्यमंत्री असणार, असे अजितदादा समर्थकांकडून देखील ठासून सांगितले जात आहे. त्यामुळे साहजिकच एकनाथ शिंदे यांच्या गटाच्या आमदार आणि कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. एकनाथ शिंदे यांनी कालच दिल्लीत सहकुटुंब पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी शिंदेंच्या कुटुंबीयांशी आपुलकीने संवाद साधला होता. मात्र, विरोधी गोटातून हा एकनाथ शिंदे यांना निरोप समारंभ असल्याची चर्चा केली जात आहे. एकूणच हे सगळे राजकीय वातावरण एकनाथ शिंदे यांच्यासाठी फारसे अनुकूल म्हणता येणार नाही. मात्र, एकीकडे असे वातावरण अन् चर्चा असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एकनाथ शिंदे यांच्याविषयी केलेलं एक ट्विट सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनले आहे. एकनाथ शिंदे पीएम भेटीनंतर म्हणाले होते की, देशाचे पंतप्रधान म्हणून कणखर आणि सक्षम असलेल्या मा. नरेंद्र मोदी यांनी आज माझे वडील, पत्नी, मुलगा खासदार एकनाथ शिंदे, सून आणि नातू यांच्यासह मला सदिच्छा भेटीला बोलावून आपलेपणाने विचारपूस केली. माझ्या कुटुंबाशी निवांत गप्पा मारल्या. एकनाथ शिंदे पीएम भेटीनंतर म्हणाले होते की, देशाचे पंतप्रधान म्हणून कणखर आणि सक्षम असलेल्या मा. नरेंद्र मोदी यांनी आज माझे वडील, पत्नी, मुलगा खासदार एकनाथ शिंदे, सून आणि नातू यांच्यासह मला सदिच्छा भेटीला बोलावून आपलेपणाने विचारपूस केली.

### राज्यातील प्रकल्प त्वरित पूर्ण करावेत

» गरीब नागरिकांना सुखाचे आयुष्य जगता येणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प विनाअडथळा वेगाने पूर्ण करावा, रखडलेले पुर्नविकास प्रकल्प मार्गी लावावेत, असे त्यांनी सांगितले. पायाभूत सुविधांना बळ मिळाले की राज्याच्या समृद्धीचा मार्ग प्रशस्त होतो. त्यामुळे राज्यातील असे प्रकल्प त्वरित पूर्ण करावेत, अशी सूचना त्यांनी केली. याशिवाय वारंवार होणारी अतिवृष्टी, त्यामुळे येणारी संकटे यावर आस्थेवाईकपणे चर्चा केली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत सहकुटुंब पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. भेटीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, राज्यातील पायाभूत सुविधांबाबत चर्चा करण्यासाठी मी पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतली. धारावी पुनर्वसन प्रकल्प तसेच राज्यातील इतर प्रकल्पांवरही मोदींशी चर्चा केली

# अर्थमंत्री अजितदादांची दादागिरी!

## » राष्ट्रवादीच्या आमदारांवर निधीची खैरात

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अर्थमंत्रीपदाची सुत्रे स्वीकारल्यानंतर अर्थमंत्री अजित पवारांनी आता आपला कारभार कसा असणार? हे दाखवायला सुरूवात केली आहे. त्यामुळे शिंदे गटाच्या आमदारांना पुन्हा धडकी भरण्याची शक्यता आहे. 'टीव्ही 9 मराठी'ने दिलेल्या वृत्तानुसार अजित पवार यांनी आपल्यासोबत आलेल्या राष्ट्रवादीच्या आमदारांवर निधीची खैरात केली आहे. मात्र, या तुलनेत शिंदे गटाच्या आमदारांना मात्र कमी निधी देण्यात आला आहे.**

ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनीदेखील आज पत्रकार परिषदेत या निधीवाटपावर भाष्य केले आहे. संजय राऊत म्हणाले, एकनाथ शिंदे फक्त आपल्या



गटाच्या आमदारांनाच निधी देतात. देवेंद्र फडणवीस भाजप आमदारांना निधी देतात. आता अजित पवारही केवळ आपल्यासोबत आलेल्या आमदारांवर निधीची खैरात करत आहेत.

मग, इतर पक्षाच्या आमदारांनी काय करायचे? त्यांनी आपल्या मतदारसंघात विकासकामे करायची नाहीत का? त्यांनी विकासाचे कोणतेही स्वप्न पाहायचे नाही का? हे धोरण राज्यासाठी अतिशय घातक आहे, असे संजय राऊत म्हणाले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, अर्थमंत्री अजित पवार यांनी पुरवणी मागण्यांमध्ये लोकप्रतिनिधींच्या विकास कामांसाठी 1 हजार 500 कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. त्यात आमदारांसाठी 25 ते 50 कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. राष्ट्रवादीच्या आमदारांना प्रत्येकी 25 कोटींचा निधी देण्यात आला आहे. काही आमदारांना तर 40 कोटींचा निधीही दिल्याचं समजते. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांना देवळाली मतदारसंघातील राष्ट्रवादीच्या आमदार सरोज अहिरे यांनी पाठिंबा दिला होता. पण नंतर त्यांनी घुमजाव करून अजित पवार यांना पाठिंबा दिला. त्यामुळे सरोज अहिरे यांच्या मतदारसंघासाठीही 40 कोटींचा निधी देण्यात आला आहे. शिंदे गटाच्या काही आमदारांनाही निधी देऊन त्यांची नाराजी दूर केली आहे.

### शिंदे गटाच्या प्रतिक्रियेकडे लक्ष

» दरम्यान, शिंदे गटाच्या आमदारांना निधी देऊन त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्नही अजित पवार यांनी केला आहे. मात्र, शिंदे गटाच्या तुलनेत राष्ट्रवादीच्या आमदारांना सर्वाधिक निधी देण्यात आल्याचे समजते. अजित पवार यांनी सुरुवातीलाच आपल्या आमदारांवर विकास निधीचा वर्षाव करून भविष्यातील निधी वाटपाचे संकेतच दिले असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे शिंदे गटाकडून यावर तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.

# इर्शाळवाडीत शोधकार्य थांबले!

। अलिबाग ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

इरशाळवाडी येथील शोध व बचाव कार्य थांबविण्यात आले आहे. ढिगाऱ्याखाली गाडल्या गेलेल्या मृतदेहांचे विघटन सुरू झाल्यामुळे परिसरामध्ये प्रचंड दुर्गंधी पसरल्याने बचाव पथके आणि आपद्ग्रस्तांशी चर्चा करून हा निर्णय घेण्यात आल्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी जाहीर केले. आतापर्यंत २७ मृतदेह बाहेर काढण्यात आले असून ५७ जण अद्यापही बेपत्ता आहेत. या सर्वांना मृत घोषित करण्याची प्रक्रिया सुरू झाल्यामुळे मृतांचा आकडा ८४ होणार आहे.

खालापूर तालुक्यातील इरशाळवाडीवर १९ जुलैला रात्री साडेअकराच्या सुमारास दरड कोसळली होती. वाडीतील ३५ घरे दरडीखाली गाडली गेली. २० तारखेला पहाटेपासून मदत व बचाव कार्य सुरू होते. पहिल्या दिवशी १६, दुसऱ्या दिवशी ६, तिसऱ्या दिवशी ५ असे एकूण २७ मृतदेह बचाव पथकांनी बाहेर काढले. रविवारी एकही मृतदेह आढळून आला नाही. शुक्रवारी सापडलेल्या मृतदेहांचे विघटन झाल्याचे दिसून आले होते. तसेच परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधीही पसरली आहे. त्यामुळे शनिवारी संध्याकाळनंतर शोधकार्य थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला. पालकमंत्री सामंत यांनी बचाव पथके, प्रशासकीय यंत्रणा आणि मृतांच्या नातेवाईकांशी यासंदर्भात चर्चा केली. इरशाळवाडीची लोकसंख्या २२८ होती. १४४ जण सध्या निवारा केंद्रात असून बेपत्ता असलेल्या ५७ जणांना मृत घोषित करण्यासंदर्भात प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला जाणार आहे. सरकारच्या मंजुरीनंतर सर्वांना मृत घोषित करण्यात येईल.

# बरेलीत कावड यात्रेवर दगडफेक!

## » कावड यात्रेत जवळपास 2 हजार भाविकांचा समावेश

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर प्रदेशातील बरेली येथे कावड यात्रेवर जमावाने दगडफेक केल्याची घटना समोर आली आहे. या कावड यात्रेत जवळपास २ हजार भाविकांचा समावेश होता. ही कावड यात्रा पवित्र जल भरण्यासाठी जात असताना जोगी नवादा भागातील शाहनूरी मशीद परिसरात हा हल्ला झाला. या घटनेत सुमारे डझनभर भाविकांसह काही पोलीस कर्मचारीही जखमी झाल्याची माहिती मिळत आहे.**



त्यामुळे शहरी नागरिकांकडून या दरवाढीवरून सरकारवर टीका होत आहे. या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशमधील योगी सरकारच्या मंत्री आणि भाजपा नेत्या प्रतिभा शुक्ला यांनी एक अजब वक्तव्य केलं आहे. प्रतिभा शुक्ला म्हणाल्या, "पहिली गोष्ट म्हणजे टोमॅटो कुंडीत लावा. सर्व वस्तू महाग आहेत, तर खाणं सोडून द्या. त्या वस्तू आपोआप स्वस्त होतील. बरेलीचे पोलीस अधीक्षक राहुल भाटी यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित कावड यात्रा कछला घाट येथून पवित्र जल आणण्यासाठी जात होती. यावेळी शाहनूरी मशीद आणि आसपासच्या घरांवरून या मिरवणुकीवर दगडफेक करण्यात आली. या घटनेत सुमारे डझनभर भाविकांसह काही पोलीस कर्मचारीही जखमी झाले. या घटनेनंतर परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### डमरू आणि कमळाची चिन्हे सापडली

» वरिष्ठ पोलीस अधीक्षक प्रभाकर चौधरी यांनी सांगितलं, "आज बारादरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कावड यात्रा निघाली होती. ही यात्रा एका धार्मिक स्थळाजवळून जाताच या यात्रेवर काहीतरी फेकलं. यामुळे दोन गटात वाद झाला. त्यातून दगडफेक झाली. पोलिसांना मिळालेल्या व्हिडीओ फुटेजमध्ये दोन्ही गटांकडून एकमेकांवर दगडफेक केल्याचं दिसत आहे. हा प्रकार घडल्यानंतर पोलीस दलाने तत्काळ परिस्थिती नियंत्रणात आणली आणि कावड यात्रेनं पुढे मार्गक्रमण केलं. या घटनेत कोणीही गंभीर जखमी झालं नाही, असेही त्यांनी सांगितलं.

---

# कुनोतील 11 चित्ते मोठ्या वाड्यात शिफ्ट

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

श्योपूरच्या कुनो नॅशनल पार्कमध्ये चित्त्यांच्या सततच्या मृत्यूमुळे व्यवस्थापन चिंतेत आहे. मोकळ्या जंगलात फिरणाऱ्या सर्व चित्त्यांना ट्रँकुलाइझ करून एकामागून एक मोठ्या बंदिस्तात हलवले जात आहे.

आतापर्यंत 11 चित्त्यांना मोठ्या बंदिवासात आणण्यात आले आहे. नामिबिया-दक्षिण आफ्रिकेतील तज्ज्ञ आणि वनविभागाची टीम त्यांची वैद्यकीय तपासणी करत आहे. 6 चित्त्यांचा रेडिओ कॉलर आयडीही काढून टाकण्यात आला आहे.

तज्ज्ञांच्या पथकाने दिलेल्या माहितीनुसार, पावक चित्त्याला शनिवारी (22 जुलै) मोठ्या वाड्यात आणण्यात आले. प्राथमिक तपासणीत तो पूर्णपणे निरोगी असल्याचे निष्पन्न झाले. सध्या त्याला मोठ्या वाड्यात ठेवण्यात येणार आहे.

विभागीय वन अधिकारी (डीएफओ) प्रकाश वर्मा यांनी रविवारी (23 जुलै) एक प्रेस नोट जारी करून ही माहिती दिली. कुनो नॅशनल पार्कच्या मोठ्या परिसरात 6 नर आणि 5 मादी असे एकूण 11 चित्ते असल्याची नोंद आहे. उर्वरित 4 चित्ते खुल्या जंगलात आहेत. एका पिल्लाला वेगळे ठेवण्यात आले आहे.

त्यांचीही एक एक करून आरोग्य तपासणी केली जाईल. तीन चित्त्यांच्या मानेला जखमा आणि संसर्ग झाला होता. कुनो व्यवस्थापनाने या संसर्गाचे कारण रेडिओ कॉलर आयडी असू शकते अशी भीती व्यक्त केली होती. यामुळे आता 6 चित्त्यांचा कॉलर आयडी काढून टाकण्यात आला आहे. उर्वरित चित्त्यांचे कॉलर आयडी काढण्याचाही विचार सुरू आहे.

डीएफओ प्रकाश वर्मा यांनी सांगितले की, सध्या कुनो नॅशनल पार्कमधून काही चित्ते राजस्थानमध्ये हलवण्याची कोणतीही योजना नाही. याबाबत वरिष्ठ अधिकारीच काही सांगू शकतील.

# यमुनेने ओलांडली धोक्याची पातळी

## » सखल भागातून लोकांचे स्थलांतर, पुरात 7 ठार

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीतील यमुनेच्या पाण्याच्या पातळीने पुन्हा धोक्याचा टप्पा ओलांडला आहे. रविवारी सकाळी हथिनीकुंड बॅरेजमधून 2 लाख क्युसेक पाणी सोडल्यानंतर सकाळी 7 वाजता पाण्याची पातळी 205.81 मीटरपर्यंत होती, मात्र दुपारी 4 वाजता पाण्याची पातळी धोक्याच्या पातळी (205.33 मीटर) वरून 206.31 मीटरवर गेली.**

सखल भागात राहणारे लोक जे पाणी ओसरल्यानंतर घरी परतले होते, त्यांना प्रशासनाने मदत छावण्यांमध्ये हलवले आहे. दिल्लीत संध्याकाळी अनेक भागात पाऊस झाला. त्यामुळे यमुनेच्या पाण्याची पातळी आणखी वाढू शकते.

हिमाचलच्या कुल्लू आणि शिमलामध्ये शनिवारी ढगफुटीच्या घटना घडल्या, तर वेगवेगळ्या अपघातांमध्ये 7 जणांचा मृत्यूही झाला आहे. त्यामुळे राज्यात पावसाळ्यातील मृतांचा आकडा 154 वर पोहोचला आहे.



### सर्व पर्यटन स्थळांवरही बंदी

जुनागड शहर आणि आसपासच्या सर्व पर्यटन स्थळांवरही बंदी घालण्यात आली आहे. लोकांना धरणे आणि चेकडॅमपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान खात्याने भावनगर, नवसारी, जुनागढ आणि वलसाडमध्ये रविवारीही अतिवृष्टीसाठी रेड अलर्ट जारी केला आहे.

शनिवारी चार तासांत झालेल्या 10 इंच पावसामुळे गुजरातमधील जुनागड शहर जलमय झाले आहे. पाऊस थांबला असला तरी अनेक भागात अजूनही पाच फुटांपर्यंत पाणी तुंबले आहे.

महाराष्ट्रात इर्शाळवाडी गावात दरड कोसळून चार दिवस उलटले तरी 57 लोक अद्याप बेपत्ता आहेत. मृतांचा आकडा 27 वर गेला आहे. यवतमाळमध्ये पुरात अडकलेल्या 45 लोकांना हवाई दलाच्या दोन हेलिकॉप्टरच्या मदतीने बाहेर काढण्यात आले आहे. गुजरातमधील जुनागड शहरात शनिवारी झालेल्या पावसामुळे दुर्वेश नगर, गणेश नगर, जोशीपारा यासह अनेक भागात शेकडो कच्ची घरे कोसळली.

येथील एकमजली घरे पाण्याखाली गेल्याने घरातील सामानाची नासाडी झाली. शहर आणि जिल्ह्यात कलम 144 लागू करण्यात आले आहे. 24 जुलैच्या रात्रीपर्यंत कोणत्याही कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

# स्वानंदीने शेअर केला साखरपुड्याचा फोटो

मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री स्वानंदी टिकेकर सध्या चांगलीच चर्चेत आहे. स्वानंदीने अगदी काहीच दिवसांपुर्वी ती रिलेशनशीपमध्ये असल्याचा जाहीर खुलासा केला होता. आज अखेर तिने साखरपुड्याचा फोटो शेअर करून सर्वांना धक्का दिला आहे. स्वानंदीने गुपचुप साखरपुडा उरकल्याच्या चर्चांना शनिवारीच उधाण आलं. त्याच कारण म्हणजे, स्वानंदीने सोशल मिडीयावर बॉयफ्रेंड आशिष कुलकर्णी सोबत फोटो पोस्ट केला होता. यात स्वानंदीच्या हातावर मेहंदी रंगलेली दिसत होती. दरम्यान स्वानंदीने आज साखरपुड्याचा फोटो शेअर केला. तसेच AND WE'RE ENGAGED कॅप्शन दिलं आहे.



स्वानंदी टिकेकर आणि आशिष कुलकर्णीने शुक्रवारी रात्री एक फोटो शेअर केला होता. यात स्वानंदीच्या हातावर मेहंदी रंगलेली दिसत होती. तर स्वानंदीचा बॉयफ्रेंड तिच्या गालावर किस करताना दिसतोय.

स्वानंदीच्या बॉयफ्रेंडचं नाव आहे आशिष कुलकर्णी. THIS IS US! असं लिहून #आमचं ठरलंय असा हॅशटॅग स्वानंदीने वापरलाय. आशिष कुलकर्षी हा गायक - संगीतकार आहे. तो इंडीयन आयडॉल 12 व्या सीझनमध्ये सहभागी होता. आशिष कुलकर्णी स्वत:चे लाईव्ह शोज सुद्धा करत असतो. आशिष आणि स्वानंदी हे दोघे एंगेज झाल्यामुळे त्यांच्या चाहत्यांना आनंद झाला आहे.

# 'झुमका गिरा रे' गाण्यावर डान्स



रणवीर सिंग आणि आलिया भट्ट त्यांच्या आगामी 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहेत. अलीकडेच चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान रणवीर-आलियाने चित्रपटाच्या झुमका गिरा रे या गाण्यावर स्टेजवर डान्स केला. यासंबंधीचा व्हिडिओ सोशल मीडियावरून समोर आला आहे. आलिया-रणवीरच्या डान्स मूव्ह्स चाहत्यांना खूप आवडल्या. व्हिडिओमध्ये आलिया भट्ट काळ्या साडीत दिसत आहे. तिने काळ्या ब्लाउजसोबत साडी मॅच केली होती. आलियाने तिचे केस बनमध्ये बांधले आणि काळी बिंदी, काळी अंगठी आणि झुमके घालून तिचा लूक पूर्ण केला. तिने तिचा मेकअपही साधा ठेवला आणि हील्स घातल्या. तर रणवीर सिंगने काळ्या टी-शर्टसोबत राखाडी रंगाचा सूट परिधान केला होता. काळ्या शूजने त्याने आपला लूक पूर्ण केला. व्हिडीओमध्ये आलिया रणवीर सिंगसोबत गाण्यावर पूर्ण उर्जा आणि जबरदस्त एक्स्प्रेशनसह डान्स करताना दिसत आहे. रणवीर आणि आलियाने स्टेजवर गाण्याचे हुक स्टेपही केले. स्टेजवरून खाली उतरताना आलियाने प्रेक्षकांच्या दिशेने फ्लाइंग किसचे हावभावही केले. व्हिडिओमध्ये संगीतकार प्रीतम देखील दिसत आहे. आलिया-रणवीरचे चाहते सोशल मीडियावर या व्हिडिओवर सातत्याने कमेंट करत आहेत.

# रॉकी और रानी की प्रेम कहानी

करण जोहरचा आगामी चित्रपट 'रॉकी और रानी की प्रेम कहानी'चा नवा ट्रेलर नुकताच रिलीज झाला आहे. तेव्हापासून या चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. याशिवाय काही दिवसांपुर्वी या चित्रपटातील 'झुमका' हे नवं गाण रिलिज करण्यात आलं. मात्र चित्रपटाचा ट्रेलर रिलिज झाला त्यावेळी ट्रेलरवरुन थोडा गोंधळ निर्माण झाला होता. ट्रेलरमध्ये दाखवण्यात आलेल्या एका दृश्यावर बरेच वादविवाद सुरू केले आहेत. त्यामुळे वाद कोर्टात गेला. पण आता मात्र



सिनेमाच्या रिलीजचा मार्ग मोकळा झालाय. पण त्यासाठी मोठ्या बदलांना सामोरं जावं लागलं आहे. 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' हा या वर्षातील बहुप्रतिक्षित चित्रपटांपैकी एक आहे. सेन्सॉर बोर्डाने काही कट सुचविल्यानंतर या चित्रपटाला सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन (CBFC) ने प्रमाणित केल्याचे समोर आले. रॉकी और रानी की प्रेम कहानी चित्रपटात केलेल्या काही बदलांमध्ये शिव्यांच्या जागी 'बहिण दी' हा शब्द समाविष्ट आहे. तसेच लोकप्रिय रम ब्रँड ओल्ड मॉकचे नाव बदलून 'बोल्ड मॉक' केले. सेन्सॉर बोर्डाने निर्मात्यांना लोकसभेचा वापर वगळण्यास सांगितले आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये राणीच्या घरी नोबेल पारितोषिक विजेते रवींद्रनाथ टागोर यांचे पोर्ट्रेट दाखवण्यात आले होते. या दृश्यात एका विशिष्ट शब्दाची जागा फिल्टरने घेतली आहे. रॉकी और रानी की प्रेम कहानी चित्रपट प्रदर्शित होण्याच्या अवघ्या चार दिवस आधी, सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन (CBFC) ने चित्रपटाचे सखोल परीक्षण केले. यावेळी त्यांनी संवादांमध्ये अनेक बदल सुचवले.

एवढेच नाही तर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याकडे निर्देश करणारा संवादही सिनेमातुन वगळण्यात आला आहे. 'रॉकी और रानी की प्रेम कहानी'ला बुधवारी त्याचे सेन्सॉर प्रमाणपत्र मिळाले, या चित्रपटाची लांबी 2 तास 48 मिनिटे आहे. हा सिनेमा २८ जुलैला रिलीज होतोय.

# शिवाली परबच्या गैरहजेरीत पुरस्कार!



महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम शिवाली परब सोशल मिडीयावर कायम चर्चेत असते. शिवाली परबने महाराष्ट्राची हास्यजत्रा च्या माध्यमातुन प्रेक्षकांच्या मनामनात स्वतःचं स्थान निर्माण केलंय. शिवाली परब सध्या हास्यजत्रा टीमसोबत अमेरिका टूरवर गेली आहे. शिवालीच्या आयुष्यात नुकताच एक छान प्रसंग घडला. ज्यामुळे शिवालीला आनंद साजला. पण सध्या अमेरिकेत असल्याने शिवाली हा आनंद साजरा करायला भारतात उपस्थित नव्हती. अशावेळी शिवालीच्या आईची नेमकी काय अवस्था झाली होती याचं खास वर्णन शिवालीने केलंय. बघुया काय झालंय... शिवालीचा यंदाचा GOLDEN WOMAN ICON AWARDS 2023 पुरस्कार मिळाला. पण सध्या अमेरिकेत असल्याने शिवाली हा पुरस्कार स्वीकारताना गैरहजर होती. तेव्हा शिवालीच्या वतीने तिच्या आईने हा पुरस्कार स्वीकारला. फोटो आणि व्हिडिओ शेअर करुन शिवाली लिहीते.. GOLDEN WOMAN ICON AWARDS 2023.. तर ह्या वर्षाचं बेस्ट पॉप्युलर एंटरटेनर.. ऑफ द ईयर हे अवॉर्ड मला मिळालं , मला माझ्या कामामुळे जाता आलं नाही म्हणून माझे मम्मी आणि पप्पा गेलेले , मम्मी पहिल्यांदा स्टेज वर गेल्यामुळे जरा घाबरलेली आणि जास्त खूश होती मम्मी स्टेज वर गेली तरी, पप्पांची हिंमतच नाही झाली , पण आनंद हा आहे की ते दोघे ही खूप खूप खुश आहेत ... THANKYOU EVERYONE असंच माझ्या कामावर प्रेम करत रहा आणि मला सपोर्ट करत रहा." अशी पोस्ट शिवालीने लिहीलीय शिवाली अत्यंत मेहनतीने इथवर पोहोचली आहे. एकेकाळी टीव्हीवर हास्यजत्रा पाहणारी शिवाली आज स्वतः टीव्हीवर हास्यजत्रा गाजवते आहे. शिवालीची हास्यजत्रेतील प्रत्येक व्यक्तिरेखा लोकप्रिय आहे. शिवालीची सर्वात गाजलेली व्यक्तिरेखा म्हणजे शिवाली अवली कोहली. शिवाली अवली कोहलीच्या माध्यमातुन वेगळाच आवाज काढुन शिवाली तिच्या फॅन्सना खळखळुन हसवते. लेकीचा पुरस्कार स्वीकारल्याने शिवालीच्या आईला नक्कीच तिचा अभिमान वाटत असेल, यात शंका नाही.

# मोहम्मद सिराजचा पंच!

## » वेस्ट इंडिजचा पहिला डाव 255 धावांवर आटोपला

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना पोर्ट ऑफ स्पेन येथील क्वीन्स पार्क ओव्हल स्टेडियमवर खेळला जात आहे. पावसामुळे शनिवारी खेळात व्यत्यय आला. यामुळे आजचा सामना अर्धा तास आधी सुरू झाला भारताने पहिल्या डावात ४३८ धावा केल्या होत्या.**

प्रत्युत्तरात वेस्ट इंडिजचा पहिला डाव २५५ धावात आटोपला असून भारताच्या मोहम्मद सिराजने शानदार गोलंदाजी करत ५ विकेट्स घेतले. टीम इंडियाला पहिल्या डावात १८३ धावांची भक्कम आघाडी मिळाली आहे. वेस्ट इंडिजचा पहिला डाव चौथ्या दिवशी २५५ धावांवर आटोपला. भारताने पहिल्या डावात ४३८ धावा केल्या होत्या. त्यामुळे भारताला १८३ धावांची आघाडी मिळाली.

मात्र, विंडीजने फॉलोऑन वाचवला आहे. मोहम्मद सिराजने भारतासाठी जबरदस्त गोलंदाजी करताना पाच विकेट्स घेतल्या. त्याचवेळी मुकेश कुमार आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेत त्यांना साथ दिली. वेस्ट इंडिजने आज २२९/५ धावांच्या पुढे खेळण्यास सुरुवात केली आणि

### ब्रेथवेटची 75 धावाची खेळी

मुकेशने मॅकेन्झीला बाद करून ही भागीदारी तोडली. मुकेशची ही पहिलीच आंतरराष्ट्रीय विकेट होती. ब्रेथवेटने कर्णधारपदाची खेळी खेळताना १७० चेंडूत कसोटी कारकिर्दीतील २९वे अर्धशतक झळकावले. यानंतर ब्रेथवेटने जर्मेन ब्लॅकवुडसोबत तिसऱ्या विकेटसाठी ४० धावांची भागीदारी केली. अश्विनचा चेंडू ब्रॅथवेटला. त्याने २३५ चेंडूत पाच चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ७५ धावा केल्या. सिराजने जोशुआ दा सिल्वाला क्लीन बोल्ड केले.



त्यांना त्यांच्या धावसंख्येत २६ धावांचीच भर घालता आली. अर्ध्या तासाच्या आत त्यांनी पाच विकेट्स गमावल्या.

आज वेस्ट इंडिजला पहिला झटका ॲलिक अथानेझच्या रूपाने बसला. त्याला नवोदित मुकेशने एलबीडब्ल्यू आऊट केले. अथनाजेला ३७ धावा करता आल्या. यानंतर सिराजचा कहर पाहायला मिळाला आणि उर्वरित चार विकेट घेत त्याने विंडीजचा डाव गुंडाळला. त्याने जेसन होल्डर (१५), अल्झारी जोसेफ (४), केमार रोच (४) आणि शॅनन गॅब्रिएल (०) यांना बाद केले. जोमेल वॅरिकन सात धावा करून नाबाद राहिला. तत्पूर्वी, वेस्ट इंडिजला पहिला झटका शुक्रवारी तेजनारायण चंद्रपॉलच्या रूपाने बसला. त्याला ३३ धावा करता आल्या.

त्याने कर्णधार क्रेग ब्रॅथवेटसोबत ७१ धावांची सलामीची भागीदारी केली होती. तिसऱ्या दिवशी (शनिवारी) वेस्ट इंडिजने एका विकेटच्या मोबदल्यात ८६ धावांनी पुढे खेळण्यास सुरुवात केली. ब्रेथवेटने कर्क मॅकेन्झीसोबत दुसऱ्या विकेटसाठी ४८ धावांची भागीदारी केली.

---

# चिराग-सात्विक कोरियाध्ये अव्वल

## » विजेतेपद पटकावणारी पहिली भारतीय जोडी

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय बॅडमिंटनपटू सात्विक साईराज आणि चिराग शेट्टी या जोडीने कोरिया ओपनचे विजेतेपद पटकावले आहे. चिराग-सात्विक जोडीने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या इंडोनेशियाच्या फजर अल्फियान आणि मोहम्मद रियान यांचा 17-21, 21-13, 21-14 अशा फरकाने पराभव केला. अंतिम सामना 62 मिनिटे चालला. या बरोबरीपूर्वी इंडोनेशियन जोडीविरुद्धचा विक्रम 2-2 असा बरोबरीत होता.**

कोरिया ओपन बॅडमिंटन स्पर्धा पहिल्यांदा 1991 मध्ये झाली. तेव्हापासून दरवर्षी दक्षिण कोरियातील विविध शहरांमध्ये ही स्पर्धा आयोजित केली जाते.

ही एक ग्रेड-2 स्पर्धा आहे, जी बॅडमिंटन सुपर-500 श्रेणी अंतर्गत येते. यामध्ये पुरुष एकेरी, महिला एकेरीसह पुरुष दुहेरी, महिला दुहेरी आणि मिश्र दुहेरीच्या 5 स्पर्धा आहेत.



### सलग दुसरे विजेतेपद पटकावले

सात्विक आणि चिराग यांनी यावर्षी इंडोनेशिया सुपर 1000 आणि स्विस ओपन सुपर 500 विजेतेपद पटकावले आहेत. जूनमध्ये इंडोनेशिया ओपन ही शेवटची स्पर्धा जिंकल्यानंतर भारतीय जोडीचे हे सलग दुसरे विजेतेपद आहे. त्याच वेळी, हे त्याचे तिसरे BWF 500 विजेतेपद आहे. यापूर्वी त्यांनी 2019 मध्ये थायलंड ओपन आणि गेल्या वर्षी इंडिया ओपन जिंकली होती.

2017 मध्ये पीव्ही सिंधूने महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले. कोरिया ओपनचे विजेतेपद जिंकणारी ती पहिली भारतीय शटलर ठरली. त्यांच्यानंतर आता पुरुष दुहेरीत सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी 2023 मध्ये विजेतेपद पटकावले.

ही जोडी दुहेरी स्पर्धेचे विजेतेपद जिंकणारी पहिली दुहेरी जोडी ठरली. यापूर्वी, सात्विक-चिराग जोडीने उपांत्य फेरीत गतविजेत्या चीनच्या वेई केंग लियांग-चांग वांग जोडीचा सरळ गेममध्ये पराभव केला होता.

उपांत्यपूर्व फेरीत त्यांनी ताकुरो होकी आणि युगो कोबायाशी या जपानी जोडीचा, राऊंड ऑफ 16 मध्ये चीनच्या हे जी टिंग आणि झोउ हाओ डोंग या जोडीचा आणि राऊंड ऑफ 32 मध्ये थाई जोडीचा सुपाक जोमकोह-किटिनपोंग केद्रेन यांचा पराभव केला.

# हरमनप्रीतने बॅट स्टंपवर मारली

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात पंचांनी एलबीडब्लू आऊट दिल्यानंतर स्टंपवर बॅट मारत संताप व्यक्त केला. पंचांच्या निर्णयावर तिने नाराजी व्यक्त केली. मैदानावरून पॅव्हेलियनमध्ये परतताना ती पंचांना रागाने काहीतरी बोलतानाही दिसली याशिवाय. ट्रॉफीच्या फोटोशूटमध्ये खेळाडूंसोबत पंचांनाही उभे करा असा टोमणाही तिने बांगलादेशच्या संघाला लावला.

सामना संपल्यानंतरही ती संताप व्यक्त करत म्हणाली, 'अंपायरिंग खूपच खराब होते, आंतरराष्ट्रीय स्तरावर असे निर्णय खूप निराशाजनक दिसतात.' हरमन 34 व्या षटकात बाद झाली आणि 226 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाला केवळ 225 धावा करता आल्या. तिसरा एकदिवसीय सामना बरोबरीत संपला आणि 3 एकदिवसीय सामन्यांची मालिका 1-1 ने बरोबरीत संपली. सामन्याचे पंच मुहम्मद कमरुझमान आणि तनवीर अहमद होते. दोन्ही पंच बांगलादेशचे आहेत.

यानंतर चषक वितरण समारंभात कर्णधार हरमनप्रीत म्हणाली, 'या सामन्यातून खूप काही शिकायला मिळाले. ज्या पद्धतीने अंपायरिंग झाले, त्यामुळे संपूर्ण संघ आश्चर्यचकित झाला. पुढच्या वेळी जेव्हाही आम्ही बांगलादेशात येऊ तेव्हा अंपायरिंग असेच होईल हे लक्षात ठेवू. आता क्रिकेटसोबतच या गोष्टींसाठीही आम्ही सज्ज होऊ.' बांगलादेशने 225 धावा केल्या, जी भारताविरुद्ध संघाची सर्वात मोठी धावसंख्या होती. यावर कौर म्हणाली, 'त्यांनी चांगली फलंदाजी केली आणि महत्त्वाच्या प्रसंगी एकेक धावाही घेतल्या.